# पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय

## अधिसूचना

नवी दिल्ली, 8 एप्रिल, 2016

S.O. 1357(E) - ज्याअर्थी घन कचरा व्यवस्थापन नियम, 2015 चा मसुदा भारत सरकारच्या अधिसूचनेअंतर्गत, पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाच्या 3 जुन 2015 तारखेच्या जी.एस.आर 151 (ई) मध्ये, भारताचे राजपत्र, भाग II विभाग 3, उप-विभाग (1) मध्ये त्याच तारखेस प्रकाशित झाला होता आणि त्याद्वारे त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असेलेल्या व्यक्तींकडून , पालिका घन कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, 2000 च्या जागी आलेल्या, घन कचरा व्यवस्थापन नियम, 2015 ची सदर अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून सहा दिवसांच्या आत, हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या;

4. **कचरा निर्मात्यांची कर्तव्ये-** 1) प्रत्येक कचरा निर्माता-

a) त्यांनी निर्माण केलेला कचरा, जैव अपघटनीय, बिगर जैवअपघटनीय आणि घरगुती घातक कचरा अशा तिन स्वतंत्र प्रकारांमध्ये विलग करून त्याचा सोयीस्कर कुंड्यांमध्ये संग्रहित करेल आणि विलग केलेला कचरा, स्थानिक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना किंवा अधिसूचनांनुसार, अधिकृत कचरा वेचकांकडे किंवा कचरा संकलकांकडे सुपूर्द करेल.

b) डायपर, सॅनिटरी पॅड इ.सारखा वापर केलेला सॅनिटरी कचरा, स्थानिक अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, उत्पादकांनी किंवा या उत्पादनांच्या ब्रँड मालकांनी पुरविलेल्या पुड्यांमध्ये किंवा सोयीस्कर आवरणामध्ये घट्टपणे गुंडाळेल आणि सुक्या कचऱ्यासाठी किंवा बिगर जैवअपघटनीय कचऱ्यासाठी असलेल्या कुंडीमध्ये ठेवील.

c) बांधकामामुळे आणि बांधकाम पाडण्यामुळे निर्माण झालेल्या कचऱ्याचा स्वत:च्या आवारात स्वतंत्र संग्रह करील आणि असा कचरा त्याच्या स्वत:च्या आवारात निर्माण झालेला असल्यास बांधकाम आणि विनाश कचरा नियम 2016 नुसार त्याची विल्हेवाट लावेल; आणि

d) त्याच्या स्वत:च्या आवारातून निर्माण झालेला फळबाग कचरा आणि उद्यान कचरा त्याच्या स्वत:च्या आवारात स्वतंत्रपणे संग्रहित करील आणि स्थानिक संस्थेने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार त्याची विल्हेवाट लावेल.

2. कोणत्याही कचरा निर्मात्याने त्याने निर्माण केलेला कचरा रस्त्यावर, उघड्या सार्वजनिक जागी किंवा त्याच्या आवाराच्या बाहेर किंवा नाल्यामध्ये किंवा जलाशयांमध्ये फेकू नये, जाळू नये किंवा पुरू नये.

3. सर्व कचरा निर्मात्यांनी अशा वापरकर्त्याला, घन कचरा व्यवस्थापनासाठी, स्थानिक संस्थांच्या पोटनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार शुल्क अदा करावे.
4. कोणत्याही व्यक्तीने, अनुज्ञ नसलेल्या स्थळी, स्थानिक संस्थेला किमान तिन कार्यदिवस अगोदर सूचना न देता, शंभरपेक्षा अधिक व्यक्तींचा समारंभ किंवा संमेलन आयोजित करु नये आणि अशा व्यक्तीने किंवा समारंभाच्या आयोजकाने, स्थानिक संस्थेने विनिर्दिष्ट केल्यानुसार, स्त्रोत स्थळी कचऱ्याचे विलगीकरण आणि आणि विलग केलेला कचरा, कचरा संकलकाकडे किंवा संस्थेकडे सुपूर्द करण्याचे सुनिश्चित करावे.
5. प्रत्येक फेरीवाल्याने त्याच्य व्यवसायाद रम्यान निर्माण झालेला कचरा जसे- टाकाऊ खाद्यपदार्थ, डिस्पोजेबल थाळ्या, कप, डबे, आवरणे, नारळाच्या करवंट्या, शिल्लक राहिलेले खाद्यपदार्थ, भाज्या, फळे इ. यांचा संग्रह करण्यासाठी सोयीस्कर भांडी ठेवावीत आणि असा कचरा स्थानिक संस्थेने सूचित केल्यानुसार कचरा साठवणूक डेपोमध्ये किंवा भांड्यामध्ये किंवा कचरागाडीमध्ये टाकावा.
6. सर्व रहिवाशी कल्याण आणि बाजार संघटनांनी या नियमांच्या अधिसूचनेपासून एका वर्षाच्या आत आणि स्थानिक संस्थेसोबत भागीदारी करून, या नियमांमध्ये विहित केल्यानुसार, स्त्रोताच्या स्थळी कचऱ्याचे विलगीकरण करण्याचे सुनिश्चित करावे, विलग केलेल्या कचऱ्याचे स्वतंत्र प्रकारांमध्ये संकलन करण्याचे सुकर करावे, पुनर्प्रकियायोग्य साहित्य अधिकृत कचरा वेचकाकडे किंवा अधिकृत पुनर्प्रकियाकाराकडे सुपूर्द करावे. जैव-अपघटनीय कचऱ्यावर प्रक्रिया, उपचार केले जातील आणि कंपोस्ट खत तयार करून किंवा जैव-मिथेनीकरणाद्वारे, शक्यतो आवारामध्येच विल्हेवाट लावली जाईल. अवशिष्ट (उर्वरित) कचरा स्थानिक संस्थेच्या निर्देशांनुसार कचरा संकलकाकडे किंवा संस्थेकडे द्यावा.
7. 5000 चौ.मी. क्षेत्रफळाच्या आणि प्रवेशद्वा असलेल्या सर्व समुदायांनी आणि संघटनांनी या नियमांच्या अधिसूचनेपासून एका वर्षाच्या आत आणि स्थानिक संस्थेसोबत भागीदारी करून, या नियमांमध्ये विहित केल्यानुसार, कचरा निर्मात्यांकडून स्त्रोताच्या स्थळी कचऱ्याचे विलगीकरण करण्याचे सुनिश्चित करावे, विलग केलेल्या कचऱ्याचे स्वतंत्र प्रकारांमध्ये संकलन करण्याचे सुकर करावे, पुनर्प्रकियायोग्य साहित्य अधिकृत कचरा वेचकाकडे किंवा अधिकृत पुनर्प्रकियाकाराकडे सुपूर्द करावे. जैव-अपघटनीय कचऱ्यावर प्रक्रिया, उपचार केले जातील आणि कंपोस्ट खत तयार करून किंवा जैव-मिथेनीकरणाद्वारे, शक्यतो आवारामध्येच विल्हेवाट लावली जाईल. अवशिष्ट (उर्वरित) कचरा स्थानिक संस्थेच्या निर्देशांनुसार कचरा संकलकाकडे किंवा संस्थेकडे द्यावा.
8. सर्व हॉटेल आणि रेस्टॉरंटस् नी या नियमांच्या अधिसूचनेपासून एका वर्षाच्या आत आणि स्थानिक संस्थेसोबत भागीदारी करून, या नियमांमध्ये विहित केल्यानुसार, स्त्रोताच्या स्थळी कचऱ्याचे विलगीकरण करण्याचे सुनिश्चित करावे, विलग केलेल्या कचऱ्याचे स्वतंत्र प्रकारांमध्ये संकलन करण्याचे सुकर करावे, पुनर्प्रकियायोग्य साहित्य अधिकृत कचरा वेचकाकडे किंवा अधिकृत पुनर्प्रकियाकाराकडे सुपूर्द करावे. जैव-अपघटनीय कचऱ्यावर प्रक्रिया, उपचार केले जातील आणि कंपोस्ट खत तयार करून किंवा जैव-मिथेनीकरणाद्वारे, शक्यतो

आवारामध्येच विल्हेवाट लावली जाईल. अवशिष्ट (उर्वरित) कचरा स्थानिक संस्थेच्य  निर्देशांनुसार कचरा संकलकाकडे किंवा संस्थेकडे द्यावा.

11. **राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील नगर विकास प्रभारी सचिवाची कर्तव्ये-** (1) राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील नगर विकास विभागाचे प्रभारी सचिव, पालिका प्रशासनाचे आयुक्ताच्य  किंवा संचालकाच्या माध्यमातून किंवा स्थानिक संस्थेच्या माध्यमातून –

a) या नियमांची अधिसूचना निघाल्यापासून एक वर्षाच्या आत, कचरा वेचकांचे प्रतिनिधी, स्वतःच मदत गट आणि कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रात काम करणारे तत्सम गट अशा संबंधितांशी विचारविनिमय करून, राज्यासाठी किंवा केंद्रशासित प्रदेशासाठी, या नियमांशी, घन कचरा व्यवस्थापना  राष्ट्रीय धोरणाशी, आणि नगर विकास मंत्रालयाचे राष्ट्रीय नागरी स्वच्छत  धोरणाशी सुसंगत राज्य धोरण आणि घन कचरा व्यवस्थाप  नीती तयार करतील;

b) राज्य धोरण आणि घन कचरा व्यवस्थापनासार्ठ नीती तयार करत असताना, भरावामध्ये जाणारा कचरा कमीतकमी करण्याचे आणि घन कचऱ्याचा मानवी आरोग्य आणि पर्यावरणावरील परिणाम कमीतकमी करण्याचे सुनिश्चित करण्यासाठी कचरा कपात, पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया, पुनर्प्राप्ती आणि घन कचऱ्याच्या विविध घटकांचा कमाल विनियोग यावर भर देतील;

c) राज्य धोरणांमध्ये आणि नीतींमध्ये, कचरा कमी करण्याच्या कामी कचरा वेचक, कचरा संकलक आणि पुनप्रक्रिया उद्योग यांचे अनौपचारिक क्षेत्र पार पाडत असलेल्या प्राथमिक भूमिकेचे महत्व ओळखून कचरा व्यवस्थापन प्रणालीमध्ये कचरा वेचक किंवा अनौपचारिक कचरा संकलकांच्या एकीकरणासंबंधी व्यापक मार्गदर्शक तत्वे पुरवतील.

d) सर्व स्थानिक अधिकाऱ्यांद्वारे या तरतूदींची अमलबजावणी केली जाईल हे सुनिश्चित करतील.

e) राज्याच्या नगर रचना विभागाला निर्देश देतील की, त्यांनी राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील प्रत्येक शहराच्या बृहद आराखड्यामध्ये, जी शहरे सामाईक कचरा प्रक्रिया सुविधेची किंवा शहरांच्या समुहासाठी प्रादेशिक स्वच्छता भरावाची सदस्य आहेत अशा शहरांना वगळता, घन कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी सुविधाकेंद्र उभारण्याचे सुनिश्चित करावे.

f) घन कचऱ्याच्य व्यवस्थापनासा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधाकेंद्र उभारण्यासाठी एका वर्षाच्या आत सोयीस्कर जागा हेरून ती स्थानिक संस्थांना वाटप करण्याचे सुनिश्चित करतील आणि महानगर आणि जिल्हा नियोजन समित्यांद्वारे किवा नगर आणि ग्राम नियोजन विभागाद्वारे त्यांचा राज्याच्या किंवा, यथास्थिती, शहरांच्या बृहद आराखड्याम (जमीन वापर आराखडा) समाविष्ट करतील;

h) राज्याच्य आणि स्थानिक संस्थेच्य नगर रचना विभागाने 200 पेक्षा अधिक घरे असलेल्या किंवा 5,000 चौ.मी.पेक्षा अधिक भुखंड क्षेत्रफळ असलेल्या समुह गृहनिर्माणासाठी किंवा व्यावसायिक, संस्थात्मक किंवा इतर कोणत्याही बिगर-निवासी संकुलासाठी, विकास योजनेमध्ये घन कचऱ्याचे विलगीकरण, संचय, आणि विकेंद्रीकृत प्रक्रिया यासाठी स्वतंत्र जागा सीमांकित केली असेल हे सुनिश्चित करावे असे निर्देश देतील;

i) विकासक, विशेष आर्थिक क्षेत्र (एसइझेड), औद्योगिक इस्टेट, औद्योगिक समूह यांच्या विकासकांना एकूण क्षेत्रफळाच्या किमान पाच टक्के क्षेत्र किंवा पाच भुखंड किंवा निवारे पुनर्प्राप्ती आणि पुनर्प्रक्रि सुविधाकेंद्रासाठी अलग राखून ठेवण्याचे निर्देश देतील.

j) प्रादेशिक केंद्रापासून ५० किमी (किंवा अधिक) अंतराच्या आत येणाऱ्या शहरांच्या आणि गावांच्या समुहासाठी खर्च विभागणी तत्वावर सामाईक प्रादेशिक स्वच्छत भराव (लॅंडफिल) ची स्थापना करण्याचे सुकर करतील आणि अशा स्वच्छत भरावांचे व्यावसायिक व्यवस्थाप करण्याचे सुनिश्चित करतील;

k) घन कचऱ्याचे व्यवस्थाप , अशा कचऱ्याचे स्रोतस्थळी विलगीकरण आणि वाहतूक किंवा प्रक्रिया यासाठी स्थानिक संस्थांच्या क्षमता बांधणी उपक्रमांची सोय करतील;

l) प्रतिदिन पाच टनापेक्षा अधिक क्षमतेच्य घन कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधाकेंद्रांसाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाशी चर्चाविनिमय करून बफर झोन अधिसूचित करतील;

m) कचरा वेचक आणि आणि कचरा व्यापाऱ्यांच्य नोंदणीसाठी योजना सुरू करतील.

12. **जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी किंवा उपआयुक्त यांची कर्तव्ये-** जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिती, उपआयुक्त-

a) या नियमांची अधिसूचना निघाल्यापासून एका वर्षाच्या आत, राज्य नगर विकास विभागाच्या प्रभारी सचिवांशी समन्वयाने, नियम 11 च्या खंड (f) नुसार त्यांच्य जिल्ह्यामध्ये घन कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधाकेंद्र स्थापन करण्यासाठी सोयीस्कर जागा हेरून वाटप करणे सुकर करतील;

b) स्थानिक संस्थांच्या कामगिरीचा, किमान तिन महिन्यातून एकदा, कचरा विलगीकरण, प्रक्रिया, उपचार आणि विल्हेवाट यासंदर्भात आढावा घेतील आणि आयुक्त किंवा पालिक प्रशासनाचे संचालक किंवा स्थानिक संस्थांचे

संचालक आणि राज्य नगर विकास विभागाचे प्रभारी सचिव यांच्याशी विचारविनिमय करून सुधारात्मक उपाययोजना करतील;

**13. राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील ग्रामपंचायत किंवा ग्रामीण विकास विभागाच्या प्रभारी सचिवाची कर्तव्ये-** (1) राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील नगर विकास विभागाच्या प्रभारी सचिवाची, या नियमांअंतर्गत अंतर्भूत आणि त्यांच्य अधिकारक्षेत्राखालील क्षेत्रांसाठी, जी कर्तव्ये आहेत तिच राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील ग्रामपंचायत किंवा ग्रामीण विकास विभागाच्या प्रभारी सचिवाची कर्तव्ये असतील.

**15. जनगणना शहरे आणि नागरी समुच्चयांच्या स्थानिक अधिकाऱ्यांची आणि ग्रामपंचायतींची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या** – स्थानिक अधिकारी आणि पंचायत-

(a) राज्य धोरण आणि नीतिची अधिसूचना काढल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्य आत राज्य धोरण आणि नीतिनुसार घन कचरा व्यवस्थापनासार्ठ घन कचरा व्यवस्थाप आराखडा तयार करतील आणि राज्यशासन किंवा केंद्रशासित प्रशासनाच्या संबंधित विभागांना किंवा राज्य शासनाने किंवा केंद्रशासित प्रदेशाच्य प्रशासनाने अधिकृत केलेल्या अभिकरणाला एक प्रत सादर करतील;

(b) झोपडपट्ट , अनौपचारिक वस्त्या, व्यावसायिक, संस्थात्मव आणि इतर बिगर-रहिवाशी आवार यासह सर्व घरांमधून विलग केलेल्या घनकचऱ्याचे घरोघरी जावून संकलन करण्याची सोय करतील. अनेक मजली इमारती, मोठी व्यावसायिक संकुले, मॉल, गृहसंकुले इत्यादींच्या बाबतीत त्यांच्य प्रवेशद्वारातू किंवा इतर एखाद्या ठरवून दिलेल्या स्थळापासून घन कचरा गोळा करतील;

(c) कचरा वेचकांच्या संघटनेस किंवा अनौपचारिक कचरा संकलकांना ओळखण्यासाठी प्रणाली स्थापन करणे आणि घन कचरा व्यवस्थ नामध्ये तसेच घरोघरी जावून कचरा संकलनामध्ये त्यांचा सहभाग सुकर करण्यासाठी या अधिकृत कचरा वेचकांच्या आणि कचरा संकलकांच्या एकीकरणासाठी चालना देतील आणि प्रणाली स्थापन करतील;

(d) स्वतःच्य मदत गटांची स्थापना सुकर करतील, ओळखपत्र देतील आणि त्यानंतर घनकचरा व्यवस्थापनामध्ये एकीकरणास तसेच घरोघरी जावून कचरा गोळा करण्यास प्रोत्साहन देतील;

(e) या नियमांची अधिसूचना निघाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत या नियमांच्या तरतूदींचा समावेश करून पोटनियम तयार करतील आणि त्यांची वेळेवर अमलबजावणी सुनिश्चित करतील;

(f) वेळोवेळी योग्य वाटेल त्यानुसार वापरकर्ता शुल्क विहित करतील आणि कचरा निर्मात्यांकडून स्वत: किंवा अधिकृत अभिकरणाद्वारे शुल्क गोळा करतील;

(g) कचरा निर्मात्यांना कागद, पाण्याच्या बाटल्या, दारूच्या बाटल्या, थंड पेयाच्या बाटल्या, टेट्रा पॅक, फळांच्या साली, आवरणे इ. रस्त्यावर, उघड्या सार्वजनिक जागी, नाल्यांमध्ये, जलाशयांमध्ये न फेकण्याबाबत किंवा न जाळण्याबाबत किंवा न पुरण्याबाबत म्हणजेच कचरा न करण्याबाबत आणि या नियमांमध्ये विहित केल्यानुसार सर्व स्त्रोत स्थळी कचऱ्याचे विलगीकरण करून विलग केलेला कचरा अधिकृत कचरा वेचकांना किंवा स्थानिक संस्थेने अधिकृत केलेल्या कचरा संकलकांना देण्याबाबत निर्देश देतील;

(h) अनौपचारिक किंवा अधिकृत कचरा वेचकांना आणि कचरा संकलकांना कचऱ्यातील पुनर्प्रक्रियायोग्य साहित्य अलग करता यावे यासाठी, पुनर्प्रक्रियायोग्य साहित्याची वर्गवारी करण्यासाठी, पुरेशी जागा असलेली साहित्य पुनर्प्राप्ती केंद्र किंवा दुय्यम साठवणूक केंद्र उभारतील आणि विलग केलेल्या पुनर्प्रक्रियायोग्य कचऱ्याच्या जसे, कागद, प्लास्टिक, धातू, काच, कापड कचऱ्याच्या संकलनासाठी कचरा वेचकांना आणि पुनर्प्रक्रियाकारांना, निर्मिती स्त्रोतापासून किंवा साहित्य पुनर्प्राप्ती केंद्रापासून, सुलभ प्रवेश देतील; जैव-अपघटनीय कचरा साठवण्यासाठीच्या कुंड्या हिरव्या रंगाने, पुनर्प्रक्रियायोग्य कचरा साठवण्यासाठीच्या कुंड्या पांढऱ्या रंगाने तर इतर कचरा साठवण्याच्या कुंड्या काळया रंगाने रंगवल्या जातील;

(i) घरगुती धोकादायक कचऱ्यासाठी कचरा जमा करण्याचे केंद्र स्थापन करतील आणि कचरा निर्मात्यांना घरगुती धोकादायक कचरा सुरक्षित विल्हेवाटीसाठी या केंद्रामध्ये टाकण्याचे निर्देश देतील. शहरामध्ये किंवा गावामध्ये विस चौरस किलोमीटर क्षेत्रफळासाठी किंवा त्याच्या भागासाठी एक याप्रमाणे अशी केंद्र स्थापन केली जातील आणि अशा केंद्रांमध्ये घरगुती धोकादायक कचरा स्वीकारण्याच्या वेळा सूचित करतील;

(j) घरगुती धोकादायक कचऱ्याची सुरक्षित साठवणूक आणि धोकादायक कचरा विल्हेवाट केंद्रापर्यंत किंवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशानुसार, सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करतील;

(k) रस्ते सफाई कामगारांना, रस्ता झाडल्यानंतर गोळा केलेली झाडाची पाने न जाळण्याचे आणि ती वेगळीकडे साठवून कचरा संकलकांकडे किंवा स्थानिक संस्थेने अधिकृत केलेल्या अभिकरणाकडे देण्याचे निर्देश देतील;

(l) कचरा वेचक आणि कचरा संकलक यांना घन कचरा व्यवस्थापना प्रशिक्षण उपलब्ध करून देतील;

(m) भाजी, फळे, फुले, मांस, कोंबडी पालन आणि मासे यांच्या बाजारपेठेतून रोजच्या रोज कचरा गोळा करतील आणि बाजारपेठांमध्ये किंवा बाजारपेठेच्या परिसरामध्ये सोयीस्कर स्थळी, आरोग्यदायी स्थिती सुनिश्चित करण्यासाठी, विकेंद्रिकृत कंपोस्ट प्रकल्प किंवा जैव-मिथेनेशन प्रकल्प स्थापन करण्यास चालना देतील;

(n) रस्ते, बोळी, आणि आडगल्ल्य मधून लोकसंख्येची घनता, व्यावसायिक वर्दळ आणि स्थानिक परिस्थिती यानुसार दररोज किंवा एक दिवस आड किंवा आठवड्यातू दोनदा स्वतंत्रपर कचरा गोळा करतील;

(o) रस्ते सफाईचा कचरा आणि पृष्ठभाग नाल्यांमधून काढलेला गाळ, थेट कचरा वाहतूक वाहनामध्ये संकलित करणे शक्य नसेल अशा परिस्थितीमध्ये तो तात्पुरता साठवण्यासाठी अच्छादित दुय्यम साठवणूक केंद्र स्थापन करतील. अशाप्रकारे संकलित केलेला कचरा स्थानिक संस्थेने ठरवल्यानुसार नियमित कालांतराने गोळा करून त्याची विल्हेवाट लावली जाईल;

(p) फळबागा, उद्याने आणि बागिचे यातील कचरा स्वतंत्रपणे गोळा करतील आणि त्यावर शक्यतो त्याच उद्यानांमध्ये आणि बगिचांमध्ये प्रक्रिया करतील;

(q) विलग केलेल्या जैव-अपघटनीय कचऱ्याची प्रक्रिया केंद्राकडे, जसे कंपोस्ट प्रकल्प, जैव-मिथेनीकरण प्रकल्प किंवा अशा कोणत्याही केंद्राकडे वाहतूक करतील अशा प्रकारच्या कचऱ्याची प्रक्रिया स्त्रोताच्या ठीकाणीच करण्यास प्रोत्साहन दिले जावे;

(r) बिगर जैव-अपघटनीय कचऱ्याची त्या त्या प्रक्रिया केंद्राकडे किंवा साहित्य पुनर्प्राप्ती केंद्राकडे किंवा दुय्यम साठवणूक केंद्राकडे वाहतूक करतील;

(s) बांधकाम आणि विनाश कचऱ्याची बांधकाम आणि विनाश कचरा व्यवस्थापन नियम, २०१६च्या तरतूदींनुसार वाहतूक करतील;

(t) केंद्राभोवती दुर्गंधी नियंत्रण आणि आरोग्यदायी परिस्थिती राखण्याच्या अटीवर, समुदायांना, कचरा व्यवस्थापन आणि घरगुती खतनिर्मिती, बायोगॅस उत्पादन, समुदाय पातळीवर कचऱ्यावरील विकेंद्रीकृत प्रक्रिया यामध्ये सहभागी करून घेतील;

(u) रासायनिक खतांचा वापर दोन वर्षात टप्प्या टप्प्याने बंद करतील आणि स्थानिक संस्थेद्वारे देखभाल करण्यात येणाऱ्या उद्याने, बगिच्यामध्ये आणि, शक्य असेल तेथे, त्यांच्या अधिकारक्षेत्राखाली येणाऱ्या इतर ठिकाणी कंपोस्ट खताचा वापर करतील. अनौपचारिक कचरा पुनर्प्रक्रिया क्षेत्राद्वारे करण्यात येणाऱ्या पुनर्प्रक्रिया उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात यावे.

(v) घन कचऱ्याच्या विविध घटकांच्या कमाल वापरासाठी, स्वत: किंवा खाजगी क्षेत्राच्या सहभागाने किंवा कोणत्याही अभिकरणाद्वारे, खालील नमूद केलेल्या योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब करून, नगर विकास मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे आणि केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केलेल्या मानकांचे पालन करून, घन कचरा व्यवस्थापन केंद्राचे आणि त्याच्याशी निगडित पायाभूत सुविधांचे, बांधकाम, परिचालन आणि देखभाल करतील. वाहतूक खर्च आणि पर्यावरणावरील परिणाम कमी करण्याच्या दृष्टिने विकेंद्रिकृत प्रक्रियेस प्राधान्य देण्यात येईल, जसे-

अ) जैव-मिथेनीकरण, सूक्ष्मजीव खत, गांडूळखत, विनॉक्सि पचन किंवा जैव-अपघटनीय कचऱ्याच्य जैव-स्थिरीकरणासाठी इतर कोणतीही योग्य प्रक्रिया;

आ) कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रक्रिया तसेच कचऱ्याच्य ज्वालाग्राही अंशासाठी रिफुस्ड डिराइव्हड फ्युएल (साधित इंधन) किंवा घनकचरा आधारित ऊर्जा प्रकल्प किंवा सिमेंट भट्ट्यां कच्चा माल म्हणून पुरवठा;

(w) शिल्लक कचऱ्याची विल्हेवाट या नियमांमध्ये विहित केलेल्या पद्धतीने लावण्यासाठी सूची 1 नुसार, स्वत: किंवा इतर कोणत्याही अभिकरणाद्वारे स्वच्छत भरावाचे (सॅनिटरी लॅंडफील) आणि त्याच्याशी संबंधित पायाभूत सुविधांचे बांधकाम, परिचालन आणि देखभाल हाती घेणे;

(x) भांडवल गुंतवणूक तसेच घन कचरा व्यवस्थाप सेवांचे परिचालन आणि देखभाल यासाठी वार्षिक अर्थसंकल्पामध्ये पुरेशा निधीची तरतूद करतील आणि या नियमांनुसार घन कचरा व्यवस्थापनासाठ आणि स्थानिक संस्थेच्य इतर अनिवार्य कार्यांसाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता झाल्यानंतरच स्थानिक संस्थेच्या स्वेच्छाधीन कार्यांसाठी निधी वाटप करण्याचे सुनिश्चित करण्यात येईल.

(y) कचऱ्याचे आकारमान, सॅनीटरी लॅंडफीलसह, दिवसाला पाच मेट्रीक टन पेक्षा अधिक असेल तर राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे किंवा प्रदूषण नियंत्रण समितीकडे, यथास्थिती, कचरा प्रक्रिया, उपचार किंवा विल्हेवाट केंद्र स्थापन करण्यासाठी अधिकृत मंजुरी मिळवण्यासाठी प्रपत्र-I मध्ये अर्ज करतील;

(z) अधिकृत मंजूरी मुदतबाह्य होण्याच्य किमान सहा दिवस अगोदर अधिकृत मंजूरीचे नुतनीकरण करण्यासाठी अर्ज सादर करणे;

(za) प्रपत्र IV मध्ये वार्षिक अहवाल तयार करून पुढील वर्षाच्या 30 एप्रिलला किंवा त्यापूर्वी पलिका प्रशासनाच्या आयुक्ताकडे किंवा संचालकाकडे किंवा नेमून दिलेल्या अधिकाऱ्याकडे पाठवतील;

(zb) हा वार्षिक अहवाल त्यानंतर दरवर्षी 31 मे पूर्वी राज्य नगर विकास विभागाच्या किंवा ग्रामपंचायतीच्या किंवा ग्रामीण विकास विभागाच्या प्रभारी सचिवांकडे तसेच त्या त्या राज्याच्या राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे किंवा प्रदूषण नियंत्रण समितीकडे पाठवण्यात येईल;

(zc) विलग केलेल्या कचऱ्याचे घरोघरी जावून संकलन करण्यासाठी आणि प्राथमिक आणि दुय्यम वाहतुकीदरम्यान मिश्रित न झालेल्या कचऱ्याची, प्रक्रिया किंवा विल्हेवाट केंद्राकडे वाहतूक करण्यासाठी कामगारांना, कंत्राटी कामगारांना आणि पर्यवेक्षकांना शिक्षित करतील;

(zd) केंद्राच्या परिचालकांद्वारे घनकचरा हाताळणाऱ्या सर्व कामगारांना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे तसेच गणवेष, फ्लुरोसंट जॅकेट, हातमोजे, रेनकोट, योग्य पादत्राणे आणि मास्क दिले जातील आणि कामगारांकडून त्याचा वापर केला जाईल हे सुनिश्चित करतील;

(ze) समुह गृहनिर्माण संस्थेच्या किंवा बाजार संकुलाच्या इमारतीच्या आराखड्याला मंजूरी देत असताना कचऱ्याचे संकलन, विलगीकरण आणि विलग केलेल्या कचऱ्याची साठवणूक यांचे केंद्र उभारण्यासाठी इमारतीच्या आराखड्यामध्ये तरतूदी समाविष्ट केल्या आहेत हे सुनिश्चित करतील; आणि

(zf) कचरा करणाऱ्या किंवा या नियमांच्या तरतूदींचे पालन न करणाऱ्या व्यक्तींवर जागीच दंड आकारण्यासाठी पोटनियम तयार करतील आणि निकष विहित करतील आणि अधिकाऱ्यांना किंवा स्थानिक संस्थांना तयार केलेल्या पोटनियमांनुसार जागीच दंड आकारण्याचे अधिकार बहाल करतील; आणि

(zg) माहिती, शिक्षण आणि संवाद मोहिमेद्वारे जनजागृती करतील आणि कचरा निर्मात्यांना खालील बाबतीत शिक्षित करतील; जसे:-

I. कचरा न करणे;

II. कचरा निर्मिती कमी करणे;

III. कचऱ्याचा शक्य त्या मर्यादेपर्यंत पुनर्वापर करणे;

IV. जैव-अपघटनीय, बिगर जैव-अपघटनीय, (पुनर्प्रक्रियायोग्य आणि ज्वलनशील) सॅनिटरी कचरा आणि घरगुती धोकादायक कचरा यांचे स्त्रोत स्थळी विलगीकरण करण्याचा सराव;

V. घरच्या घरी खत तयार करणे, गांडूळखत, बायोगॅस निर्मिती किंवा समुदाय पातळीवरील खनिर्मिती यांचा सराव;

VI. वापरलेला सॅनिटरी कचरा जेव्हा जेव्हा निर्माण होईल तेव्हा, ब्रँड मालकांनी दिलेल्या पुड्यांमध्ये किंवा स्थानिक संस्थांनी विहित केल्यानुसार सोयीस्कर आवरणामध्ये घट्ट गुंडाळून तो बिगर जैव-अपघटनीय कचऱ्यासाठीच्या कुंडीमध्ये टाकणे;

VII. विलग केलेला कचरा स्त्रोत स्थळी वेगवेगळ्या कुंड्यामध्ये साठवणे;

VIII. विलग केलेला कचरा, कचरा वेचक, पुनर्प्रक्रियाकारक किंवा कचरा संकलन अभिकरणांकडे सुपूर्द करणे;

IX. कचरा संकलकास किंवा स्थानिक संस्थेस किंवा स्थानिक संस्थेने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्या व्यक्तीस, घन कचरा व्यवस्थापनाच्या टिकावासाठी, मासिक वापरकर्ता शुल्क किंवा आकार देणे.

(zh) नियम 23 मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार, सॅनिटरीलॅंडफीलची स्थापना आणि त्यांचे परिचालन सुरु करण्यासाठीची मुदत संपल्यानंतर लागलीच, मिश्र कचरा खड्यांमध्ये टाकणे थांबवतील;

(zi) केवळ बिगर-वापरयोग्य, बिगर-पुनर्प्रक्रियायोग्य नसलेले, बिगर-जैवअपघटनीय, बिगर-ज्वलनशील, बिगर-अभिक्रियाकारक निष्क्रिय कचरा आणि प्रक्रियापूर्व नाकारलेले पदार्थ आणि कचरा प्रक्रिया केंद्रातील अवशिष्ट पदार्थ सॅनिटरी लॅंडफिलमध्ये जावू देतील आणि सॅनिटरी लॅंडफिल स्थळांना सूची-1 मधील विनिर्दिष्ट अटींची पूर्तता करावी लागेल, परंतू, लॅंडफिलमध्ये जाणारा कचरा शुन्य करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नाकारलेल्या पदार्थांवर पुनर्प्रक्रिया किंवा त्यांचा पुनर्वापर करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील;

(zj) कचरा टाकण्याची जुनी उघडी ठिकाणे आणि कचरा टाकण्याची सध्याची कार्यरत ठिकाणे यांचे त्यांच्या जैव खाणकाम आणि जैव-उपचार यांच्या क्षमतेसाठी अन्वेषण आणि विश्लेषण करतील आणि व्यवहार्य असेल तेथे स्थळाचे जैव खाणकाम आणि जैव-उपचार करयासाठी आवश्यक पावले उचलतील;

(zk) जैव खाणकाम आणि जैव-उपचार क्षमताधारक कचरा टाकण्याच्या स्थळांच्या अनुपस्थितीत, पर्यावरणाचे अधिक नुकसान टाळण्यासाठी, लॅंडफिल झाकण्याच्या नियमांनुसार शास्त्रोक्त पद्धतीने आच्छादित केले जाईल.

16. **राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची किंवा प्रदूषण नियंत्रण समितीची कर्तव्ये**-(1) राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची किंवा प्रदूषण नियंत्रण समिती:

a) या नियमांची त्यांच्या राज्यामध्ये स्थानिक संस्थेद्वारे त्यांच्या संबंधीत अधिकारक्षेत्रामध्ये अंमलबजावणी करतील आणि पालिका प्रशासनाच्या संबंधित संचालनालयाशी किंवा राज्य नगर विकास विभागाच्या प्रभारी सचिवांशी समन्वय साधून या नियमांच्या अंमलबजावणीचा वर्षातून किमान दोनदा आढावा घेईल;
b) कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट स्थळांसाठी अनुसूची I आणि अनुसूची II मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार पर्यावरणीय मानके आणि अटींचे पालन यावर देखरेख ठेवतील;
c) स्थानिक संस्थेकडून किंवा स्थानिक संस्थेने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अभिकरणाकडून अधिकृत मान्यतेसाठी प्रपत्र I मध्ये अर्ज प्राप्त झाल्यावर अधिकृत मान्यतेसाठीचा प्रस्ताव तपासून आवश्यक वाटणारी चौकशी करतील;
d) अधिकृत मंजूरीसाठीचा प्रस्ताव तपासत असताना, संबंधीत अधिनियमाअंतर्गत मंजूरीची आवश्यकता आणि इतर अभिकरणांची मते जसे, राज्य नगर विकास विभाग, नगर आणि ग्राम नियोजन विभाग, जिल्हा नियोजन समिती किंवा महानगर क्षेत्र नियोजन समिती, यथास्थिती, विमानतळ किंवा एयरबेस प्राधिकरण, भूजल मंडळ, रेल्वे, वीज वितरण कंपन्या, महामार्ग विभाग आणि इतर संबंधित अभिकरणे, विचारात घेतली जातील आणि त्यांना त्यांची मते, असतील तर, देण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी दिला जाईल;

e) स्थानिक संस्थेला किंवा केंद्रचालकाला किंवा स्थानिक संस्थेने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अभिकरणाला अनुसूची I आणि II मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार अनुपालन निकष आणि पर्यावरणीय मानके तसेच, आवश्यकतेनुसार, इतर अटी निर्धारित करून साठ दिवसांच्या आत प्रपत्र II मध्ये अधिकृत मंजूरी देईल;

f) सदरील अधिकृत मंजूरीची वैधता मंजूरींच्या वैधतेशी समक्रमित करील;

g) स्थानिक संस्था किंवा केंद्र चालक निर्धारित केलेल्या अटीनुसार केंद्र चालवत नसेल तर, खंड (a) अंतर्गत दिलेली अधिकृत मंजूरी कोणत्याही वेळी निलंबित किंवा रद्द करील:

परंतू, स्थानिक संस्थेला किंवा चालकाला, यथास्थिती, सूचना दिल्याशिवाय अशी अधिकृत मंजूरी निलंबित किंवा रद्द करता येणार नाही; आणि

h) नुतनीकरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यावर, प्रत्येक अर्जाची गुणवत्तेच्या आधारे तपासणी करून केंद्र चालकाने, अधिकृत मंजूरीमध्ये, मंजूरींमध्ये किंवा पर्यावरण मंजूरीमध्ये विनिर्दिष्ट नियमांच्या, मानकांच्या किंवा अटींच्या सर्व तरतूदींचे पालन केले असल्याच्या अटीवर, अधिकृत मंजूरीचे पुढील पाच वर्षांसाठी नुतनीकरण करतील.

2. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची पर्याप्त संधी दिल्यानंतर, आणि नकार देण्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदवल्यानंतर, अधिकृत मंजूरीस देण्यास किंवा तिच्या नुतनीकरणास नकार देतील;

3. नवीन तंत्रज्ञानाच्या बाबतीत, जेथे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने किंवा प्रदूषण नियंत्रण समितीने, यथास्थिती, कोणतीही मानके विहित केलेली नाहीत, मानके विनिर्दिष्ट करून घेण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जातील.

4. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती, यथास्थिती, विहित केलेली किंवा ठरवून दिलेली मानके आणि मंजूर केलेले उपचार तंत्रज्ञान, अधिकृत मंजूरीमध्ये निर्धारित केलेल्या अटी आणि अनुसूची I आणि II अंतर्गत विनिर्दिष्ट मानके यांच्या अनुपालनावर, आवश्यकता वाटेल तेव्हा, परंतू वर्षातून किमान एकदा, देखरेख ठेवील.

5. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती, कचरा निर्मात्यांनी धोकादायक कचरा जमा करण्याच्या केंद्रावर जमा केलेल्या, घरगुती धोकादायक कचऱ्याच्या सुरक्षित हाताळणी आणि विल्हेवाट लावण्यासाठी स्थानिक संस्थांना निर्देश देवू शकते.

6. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती कचऱ्याच्या आंतर-राज्य हालचालीचे नियमन करेल.